# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अहमदनगर महानगरपालिकेच्या युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत सुधारित पाणीपुरवठा योजना फेज २ करिता कर्ज उभारणीचा प्रस्ताव

**(१) २४९६ (२३-१२-२०१४). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेच्या युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत प्रगतीपथावर असलेली अहमदनगर शहर सुधारित पाणीपुरवठा योजना फेज २ करिता कर्ज उभारणी प्रस्तावास परवानगीबाबत अहमदनगर महानगरपलिकेने शासनाकडे पत्र क्र.९३२ दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२ अन्वये पनवानगी मागून दिनांक २० नोव्हेंबर, २०१३ रोजी प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावास सुमारे अडीच वर्षाच्या कालावधी होऊन अद्याप मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देऊन निधी उभारुन सदर प्रकल्प तातडीने होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत अहमदनगर महानगरपालिकेच्या मंजूर वाढीव पाणी पुरवठा या प्रकल्पाकरीता हुडको या वित्तीय संस्थेकडून रुपये २९.५२५० कोटी इतक्या कर्ज उभारणीच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०९ (१) च्या अनुषंगाने समाविष्ट अटी तसेच शासनाने विहित केलेल्या अटींच्या अधीन राहून शासन निर्णय दिनांक ०४.१२.२०१५ अन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे.

---

**मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात (बीकेसी) ई व जी ब्लॉकमध्ये**
**स्मार्ट सीटीचा प्रयोग राबविण्याबाबत**

**(२) २६८३ (२३-१२-२०१४). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात (बीकेसी) ई व जी ब्लॉकमध्ये स्मार्ट सीटीचा प्रयोग राबविण्याचा निर्णय विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या एमएमआरडीएने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प किती टप्प्यात राबविण्यात येणार आहे व पहिल्या टप्प्यात कोणकोणते प्रकल्प राबविण्यात येणार आहेत व दुसऱ्या टप्प्यात कोणत्या बाबी समाविष्ट आहेत,

(३) याप्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत हे ही खरे आहे काय, असल्यास, याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) वरील प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर स्मार्ट सीटीचा प्रयोग मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात ई व जी ब्लॉकमध्ये ३ टप्प्यात विकसित करावयाचा असून टप्पा-१ (आयसीटी) मध्ये वाय-फाय उपक्रम, स्मार्ट पार्किंग उपक्रम, सिटीझन्स ॲप, इंटेग्रेटेड बिल्डिंग मॉनिटोरिंग सिस्टिम, कमांड ॲन्ड कन्ट्रोल सेन्टर, उर्जा बचत करणारे पथ दिवे व सीसीटिव्ही प्रकल्पाचा समावेश आहे.

टप्पा-२ (नॉन आयसीटी) मध्ये हायब्रिड/ईलेक्ट्रीक बसेस, सौर उर्जेवर चालणारे पथ दिवे, मिठी नदीची स्वच्छता करणे यांचा समावेश असून टप्पा-३ (अर्बन डिझाईन) मध्ये ग्रीन बिल्डींग, स्मार्ट स्ट्रिट फर्निचर, ऑन लाईन इमारत आराखडा मंजूरी, ईझी ऑफ डुईंग बिजीनेस, डिजिटल एमएमआर, जीआयएस व जीपीएस आधारित सेवा व ग्रीन पार्क व आणि उद्याने/लॅड स्केपींग या कामांचा समावेश आहे.

(३) सदर प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या असून निविदा सदर करण्याच्या अंतिम दिनांकास (०२.११.२०१५) दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदर निविदेची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निविदा मुल्यांकन समितीव्दारे छाननी सुरु आहे.

(४) सदर प्रकल्प एक वर्षात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**मुंबईतील जागोजागी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी एलिव्हेटेड लोकल ट्रेन, भुमिगत मेट्रो**
**अशा महत्वाच्या पायाभूत सुविधांबाबत**

**(३) ५५७८ (०७-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जागोजागी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी एलिव्हेटेड लोकल ट्रेन, भुमिगत मेट्रो अशा महत्वाच्या पायाभूत सुविधांना शासनाने मंजूरी दिली असल्याचे

दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०१६) :**(१) सदर विषयाच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये पायाभुत सुविधांना मंजूरी देण्याच्या अनुषंगाने (१) ठाणे रेल्वे स्थानक ते विटावा (कळवा) दरम्यान आकाशमार्गिका बांधणेसाठी मेसर्स श्रीखंडे कन्सल्टन्ट प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे, (२) विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिमेकडील वसई-भाईंदरला जोडणाऱ्या खाडीवरील पुलाच्या बांधकामास व (३) विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतग्रत छेडा नगर जंक्शन, घाटकोपर पूर्व येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविण्यास प्रशासकिय मान्यता देण्याच प्रस्ताव प्राधिकरणाच्या आगामी बैठकित मान्यतेकरीता सादर करण्याची शिफारस करण्यास मान्यता दिली आहे, (४) विस्तारीत मुंबई भाईंदर-गोराई मनोरीत (गोराई ते मनोरीतर) रस्त्याचे, पुलांचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेट्टी रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंतग्रत रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामाच्या सुधारीत किंमतीस मान्यता दिली आहे, (५) मुब्रा जंक्शन व शिळफाटा कल्याण जंक्शन येथे उड्डाणपुलाच्या बांधकामास सुधारीत प्रशासकिय मान्यता दिली आहे, (६) मुंबई महानगर प्रदेशाच्या बाह्य क्षेत्रातील रस्त्यांच्या सुधारणा योजनेतंतर्गत रस्त्याच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन कामाकरीता मे. एक्स, सी.सी. इंजिनियर्स आणि प्लॅनर्स यांची निविदा मंजूर करण्यात आल्या आहेत, (७) खोपोली शहर वळण रस्त्याचे पुलांसह दुपदरीकरण व सुधारणा कामाकरिता मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यात आली आहे, (८) मोनोरेलच्या नियोजित ५ स्थानकांवरील पादचारी पुल उभारण्याकरीता सल्लागार म्हणून काम करण्यासाठी M/s. XCC Engininеers & Planners यांच्या नियुक्ती मान्यता दिली आहे. (९) ठाणे भिवंडी कल्याण उप प्रदेशासाठी सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेकरिता तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी M/s. D'Applolonia S.P.A.Genova, Italy & TCE Ltd., Mumbai यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली आहे, (१०) नवघर ते चिरनेर या प्रस्तावित बहुउद्देशीय वाहतुक मार्गाकरिता मे.एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनियर प्रा.लि. यांची प्रकलप सल्लागार म्हणून निवडीस मान्यता दिली आहे, (११) विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत शिळाफाटा महापे रस्त्यावर एल ॲण्ड टी जंक्शन येथे चौपदी उड्डाणपुल व सेवा रस्त्यासहीत उर्वरीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण कामासाठी मे.एन.ए.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांची निवीदा स्विकारण्यास व आर्थिक बदलास अधिदान करण्या मान्यता दिली आहे, (१२) ठाणे बेलापूर रस्त्यावरील सविता केमिकल्स जंक्शन, घणसोली नाका व तळवली नाका येथे उड्डाणपूल आणि महापे जंक्शन येथे भुयारी वाहन मार्गाचे बांधकामासाठी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांच्या लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता दिली आहे.

(२) व (३) उपरोक्त प्रकल्पासंदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**नवीन-शेवा व हनूमान कोळीवाडा ता.उरण, जि.रायगड या विस्तापीत गावांचे पूनर्वसन करण्याबाबत**

**(४) ७२१५ (०८-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी दिनांक १० एप्रिल, २०१३ व दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी विस्तापीत नवीन-शेवा व हनूमान कोळीवाडा (ता.उरण, जि.रायगड) या विस्तापीत गावांचे पूनर्वसन करण्याबाबत मा.प्रधान सचिव, नगर विकास (१) मंत्रालय यांना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही विस्तापीत गावांना सादर केलेल्या अहवालानुसार नुसार पूनर्वसनाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१) होय.

(२) नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा या गावांच्या पुनर्वसन करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांनी सादर केलेल्या अहवालांच्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव (नगर विकास-१) यांच्याकडे दि. १६.२.२०१६ रोजी व्यवस्थापकीय संचालक, सिडको, विभागीय आयुक्त, कोकण, जे.एन.पी.टी व जिल्हाधिकारी, रायगड यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली असून याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**भद्रावती व वरोरा (जि.चंद्रपूर ) नगरपरिषदांना वाढीव व सुधारित पाणीपुरवठा योजनेकरिता विशेष निधी मिळणेबाबत**

**(५) ८६४८ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती नगरपरिषदेला (जि.चंद्रपूर) वाढीव पाणीपुरवठा योजनेला विशेष निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,

(२) तसेच वरोरा नगरपरिषद (जि.चंद्रपूर) येथील सुधारित पाणी पुरवठा योजनेच्या मंजूर प्रस्तावानुसार निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर,

२०१४ रोजी वा त्या सुमारास मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना एक लेखी निवेदन दिले होते हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय,
(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियांनोतर्गत मंजूर भद्रावती वाढीव पाणी पुरवठा योजनेस दरसुचीतील येणारे किंमतीच्या फरकाची ५० टक्के रक्कम रु. ३.९८ कोटी पूरक अनुदान स्वरुपात वितरीत करण्यात आलेली आहे.

नगरपरिषद बरोरा जि. चंद्रपूर येथील सुधारित पाणी पुरवठा योजनेस पाणी पुरवठा विभागाच्या सुजल व निर्मल अभियानांतर्गत तत्वत: मान्यता दिली होती. तथापि निधी अभावी सदर प्रकल्प रद्द करुन सदर प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानात सादर करणेबाबत सूचना पाणी पुरवठा विभागामार्फत देण्यात आल्या आहेत. तथापि, वरोरा पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नाही.

---

**पारोळा (जि.जळगांव) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत**

**(६) ११६६१ (०७-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा (जि.जळगांव) येथील पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून अद्यापही अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत मंजूर पारोळा पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याबाबत शासकीय तंत्रनिकेतन तळगांव यांनी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे.
(२) सदर योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झालेली असून सदर पाईपलाईनद्वारे पारोळा शहरास पाणी पुरवठा सुरु आहे. सदर योजना अंतर्गत पूर्ण झालेली कामे भविष्यात दैनेदिन देखभाल व दुरुस्तीकामी नगरपरिषद पारोळा यांना हस्तांतरीत करणेत आली आहेत.

(३) व (४) सदर योजनच्या कामाची शासकिय तंत्रनिकेतन जळगांव यांचे कडून (त्रयस्थ यंत्रणा म्हणून) पाहणी करण्यात आली असून, त्यानुसार प्रकल्पाच काम समाधानकारक आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला जे.एन.आर.यु.एम. योजनेअंतर्गत शहरातील मुख्य रस्ते, गटारे व पायाभूत सुविधाबाबत**

**(७) १२०३५ (०७-०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला जे.एन.आर.यु.एम. योजनेअंतर्गत शहरातील मुख्य रस्ते, गटारे व पायाभूत सुविधा याकरिता मोठ्या प्रमाणावर शासनाचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध होवून सुध्दा अद्याप पावेतो प्रत्यक्ष कामाची सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. कारण ज्या प्रकल्पांकरीता निधी उपलब्ध घाला ते बहुतांशी पुर्ण झाले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गुंदवली (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील शासकीय जमिनीवर केलेले अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत**

**(८) १४२२९ (०४-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुंदवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्वे नं २६/९ या खाजगी जमिनीवर श्री.रूद्रप्रताप त्रिपाठी यांनी केलेले अनधिकृत बांधकाम एमएमआरडीए मार्फत अद्यापि पाडण्यात आलेले नाही हे खरे आहे काय,

(२) तसेच शासकीय जमिनीवरील सदरहू अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी एमएमआरडीएने जिल्हाधिकारी, ठाणे यांना १ कोटी रूपयांचा निधी दिला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम केव्हा पाडण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसादरण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) होय.

मौजे गुंडवली, ता. भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नं. २६/९ या जमिनीवर श्री. रुद्रप्रताप त्रिपाठी व शिवाराम सुदर्शप त्रिपाठी यांच्या मालकीच्या इंडियन कॉर्पोेरेशन यांनी विनापरवाना बांधकाम केलेले आहे.

त्यासंदर्भात त्यांनी मा. दिवाणी न्यायालय, भिवंडी येथे दावा क्रमांक ३९५/१५ आखल केला असून मा. दिवाणी न्यायालयाने जैसे थे परिस्थिती राखण्याचे आदेश दिले असून बाब न्यायप्रविष्ठ आहे.

---

**अमरावती व बडनेरा शहराची बाढलेली लोकसंख्या विचार करुन कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान कार्यक्रमाअंतर्गत**

**(९) १६०४९ (०८-०४-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती व बडनेरा शहराची बाढलेली लोकसंख्या हि बाब विचारात घेता म.जि.प्रा. अमरावती यांनी उपरोक्त कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान कार्यक्रमाअंतर्गत अमरावती शहरासाठी प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग- २ मंत्रालय, मुंबई यांचेकडे मुख्य अभियंता (म.नि) नागरि ३६९/२६६ दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ अन्वये व त्यानंतर दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी मंत्रालय मुंबई येथील पाणी पुरवठा व स्वच्छता समिती समोर बैठकीमध्ये मंजूरी करिता ठेवण्यात आली असता मंजूरी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती-बडनेरा शहरातील वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता त्यांना सुख सुविधा देण्यासाठी शासनाकडे सादर केलेला ४८२१.८९ रु. चा प्रस्तावास मंजुरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) तद्नंतर अमरावती शहरासाठी रु. ४४ कोटीची पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत नगरपारिषद प्रशासन संचालनालयास सादर करण्यात आली आहे. त्यानुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत दिनांक १५/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर पाणी पुरवठा योजनेमध्ये असलेल्या त्रुटी कळविण्यात आल्या आहेत. सदर त्रुटींची पूर्तता अमरावती महानगरपालिकेमार्फत अदयाप करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिका अंतर्गत नगरोत्थान योजनेअंतर्गत विविध रस्त्याच्या कामाबाबत**

**(१०) १६०७७ (०८-०४-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका अंतर्गत नगरोत्थान योजनेअंतर्गत कंवर नगर चौक ते शंकर नगर चौक पर्यंत रस्ता सुधारणा, गाेपाल नगर ते टि-पाॅईंट ते मिनी बायपास रस्ता

सुधारणा, कलोती नगर ते मंगलधाम येथील वाहणाऱ्या नाल्यावर पुरसंरक्षण भिंत बांधणे, शिवाजी मार्केट येथील वाहणाऱ्या नाल्याला पुर संरक्षक भिंत बांधणे, मायानगर बायपास ते स्वागतम् कॉलनी पर्यंत नाल्याला संरक्षक भिंत बांधणे अमरावती - भानखेडा- गोविदपुर- कोन्डेश्वर ते जुना बायपास बडनेरा, मनपा अमरावती नगरोत्थान योजनेअंतर्गत झालेला रस्ता गोपाल नगर ते टी पॉईंट एम.आय.डी.सी. पर्यंत रसता बांधकाम, मनपा अमरावती येथील कवंर नगर ते शंकर नगर रस्ता बांधकाम, शिवाजी मार्केट येथील वाहणाऱ्या नाल्याला पुर संरक्षण भिंत बांधणे, मायानगर बायपास ते स्वागतम् कॉलनी पर्यत नाल्याला संरक्षण भिंत बांधणे इत्यादी निकृष्ट दर्जाची कामे झाली व काही सुरु आहे असे अशा अनेक तक्रारी मतदार संघातील नागरिकांनी केलेल्या असून त्या अनुषंगाने संबंधीत लोकप्रतिनिधींनी यांनी कामांची गुणवत्ता व दर्जेदार होण्यासाठी म.न.पा. आयुक्त यांना वारंवार लेखी सुचना देऊनही या कामी म.न.पा. आयुक्त यांनी दिरंगाई केल्याने निकृष्ट दर्जाची कामे झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दिरंगाई करण्याऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही केली व निकृष्ट झालेल्या कामांची चौकशी होईपर्यंत कंत्राटदाराचे देयके प्रलंबित ठेवण्यात येणार आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६)** :(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरात्थान महाभियान अंतर्गत मंजूर रस्ते विकास प्रकल्पाच्या अनुषंगाने कामाची गुणवत्ता व दर्जा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं यांचे पत्र अमरावती महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. त्यानुसार कंचर नगर चौक ते शकंर नगर चौक पर्यंत रस्ता सुधारणा व गोपाल नगर "टि" पॉईन्ट ते मिनी बायपास रस्ता सुधारणा या कामाचे त्रयस्त तांत्रिक परिक्षणाकरीता शासकीय महाविद्यालय, अमरावती यांना अमरावती महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे. कामाची गुणवत्ता राखण्याचे अनुषंगाने कामे सुरु असतांना बांधकाम साहित्याचे नमुने नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रयोगशाळेमध्ये तपासणी करीता पाठविण्यात आलेले असून, त्यांचे प्राप्त चाचणी अहवाल समाधानकारक असल्याबाबत अमरावती महानगरपालिकेने अहवाल सादर केला आहे.

(२) उपरोक्त अनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयास तांत्रिक परिक्षण करण्यास कळविण्यात आले असून अहवाल प्राप्त होईपर्यंत कंत्राटदाराने देयक अमरावती महानगरपालिकामार्फत प्रलंबित ठेवण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील हमालांना पेन्शन देण्याबाबत**

**(११) १६६८८ (११-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हमालांनाही पेन्शन देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य हमाल, माथाडी महामंडळाने पंढरपूर येथे माहे मार्च २०१५ च्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२३-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही. तथापि संघटनेने त्यांच्या विविध मांगण्यांबाबत दिनांक १५/०७/२०१५ रोजी दिलेले निवेदन जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्यामार्फत शासनास प्राप्त झालेअसून त्यात सदरहू मागणीचा समावेश आहे.

(२) हमालांना पेन्शन देण्याबाबत माथाडी अधिनियम, १९६९ व त्याखाली तयार केलेल्या योजनांमध्ये कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्मार्ट सिटी समजल्या जाणा-या इस्त्रायल शहराप्रमाणे नागपूर, मुंबई, औरंगाबाद आणि नाशिक शहराचा विकास करण्याबाबत**

**(१२) १८८३३ (१२-०८-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगातील स्मार्ट सिटी समजल्या जाणाऱ्या इस्त्रायल शहराप्रमाणे मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिक या शहरांना इस्त्राईलमधील तेल अविन शहराच्या सहकार्याने स्मार्ट सिटी बनविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात निर्णय घेतला आहे काय, सदरहू शहरांचा सुनियोजित विकास साधण्यासाठी कोणकोणत्या बाबींना प्राधान्य देण्यात येणार आहे व यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहे,

(३) याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६)** :(१) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियान राज्यात राबविण्यात येत असून, सदर अभियानांतर्गत मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, सोलापूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर या राज्यातील १० शहरांची संभाव्य स्मार्ट शहरेम्हणुन निवड अभियानाच्या प्रथम टप्प्यात करण्यात आली आहे.
(२) व (३) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियान राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली असून त्यानुसार अभियानाच्या प्रथम टप्प्यात राज्यातील १० संभाव्य स्मार्ट शहरांची निवड करण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या सुचनेनुसार अभियान शहरांनी नागरिकांचा सहभाग विचारात घेऊन स्वच्छ, शाश्वत, पर्यावरणपुरक स्मार्ट शहरे तयार करणच्या अनुषंगाने स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार केलेले आहेत.

केंद्र शासन स्तरावर अभियांनाच्या दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेंज या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सदर प्रस्ताव केंद्र शासनास विहित कालावधीत सादर करण्यात आलेले आहेत.

---

**मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र १७ वरिल रायगड जिल्हयातील पोलादपूर आणि रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्याच्या सीमेवरील कशेडी टॅप वाहतूक पोलिस चौकीलगत गेल्या वर्षापासून ऊन-पाऊस झेलत उभ्या असलेल्या ॲम्ब्युलन्सने जागा सोडून ती बेपत्ता असल्याबाबत**

**(१३) २२४९३ (०९-०९-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र १७ वरिल रायगड जिल्हयातील पोलादपूर आणि रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्याच्या सीमेवरील कशेडी टॅप वाहतूक पोलिस चौकीलगत गेल्या वर्षापासून ऊन-पाऊस झेलत उभ्या असलेल्या ॲम्ब्युलन्सने जागा सोडून ती बेपत्ता झाली असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच त्यालगत उभ्या असलेल्या दोन टोईग क्रेन्सदेखील जागेपासून कांही अंतरावर आडोशाला उभ्या राहून गंजू लागल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाखो रुपये किंमतीच्या यंत्रसामुग्रीचा उपयोग होण्यापूर्वीच विल्हेवाट लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) तद् नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) वा. मे. केंद्र कशेडी येथे दोन्ही टोईंग क्रेन व ॲम्बुलन्स तांत्रिक बिघाडामुळे नादुरुस्त झाल्याने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, रत्नागिरी यांनी दोन्ही केंन्स व ॲम्बुलन्स भंगारात काढणेबाबत तपासणी अहवाल सादर केलेला आहे. त्याप्रमाणे कारवाई चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरण परिसरात प्रवेशास बंदी असतांनाही पर्यटक व त्यांची वाहने धरणाच्या परिसरात जात असल्याबाबत**

**(१४) २५०६५ (१४-०८-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरण परिसरात प्रवेशास बंदी असतांनाही माहे मे, २०१५ मध्ये पर्यटकांची वाहने बॅकवॉटरपर्यंत जाऊन गंगाव-हे गावाच्या शिवारात चार चाकी वाहनाने पेट घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच धरणाच्या परिसरात मद्यपींचा धांगडधिगाण्याचे अनेक प्रकार मे, २०१५ मध्ये झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गंगापूर धरणाच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गंगापूर धरण परिसरात मद्यपींना धांगडधिंगाणा घातल्याचे प्रकार घडल्यासंदर्भात पोलीस स्टेशनला कोणतीही तक्रार दाखल नाही.

(३) गंगापूरर धरणाच्या सुरक्षितेबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

१. धरण परिसरात "प्रवेश निषिध्द" असल्याचे फलक लावण्यात आले आहेत.

२. निधीध्द क्षेत्रामध्ये वाहनांनी/ पर्यटकांनी प्रवेश केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाते.

३. गंगापूर धरणस्थळी पाटबंधारे विभागाकडून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आले आहेत.

४. मुख्य धरणावर व तसेच मांडवा, मुख्य विमोचक इत्यादी ठिकाणी खात्याकडे उपलब्ध असलेल्या मजूर चौकीदार यांच्या देखरेखीसाठी नेमणूका केलेल्या आहेत.

५. जलाशयाच्या बुडीत क्षेत्रालगत ज्या ठिकाणी पर्यटक जाण्याची शक्यता आहे. अशा ठिकाणी प्रतिबंधात्मक फलक व आडवे बॅरीयर्स लावले आहेत.

६. पोलीसांकडून धरण परिसरात नियमित गस्त घातली जाते.

७. दि. १९.८.२०१५ रोजी गंगापूर धरणाचा सुरक्षा आढावा पोलीस अधिकाऱ्यामार्फत घेण्यात आला असून त्रुटीबाबत आवश्यक त्या सूचना प्रशासक व अधिक्षक अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) येथील संभाजीनगरात एकाच रात्री चार ठिकाणी चो-या झाल्याबाबत**

**(१५) २५४१२ (१२-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील संभाजीनगरात दिनांक ७ जून, २०१५ रोजी एकाच रात्री चार ठिकाणी चो-या झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय, ६.६.२०१५ रोजी शिक्षक कॉलनी भागात राहणाऱ्या दोघांच्या घरी चोरी झाली होती.

(२) पोलीस स्टेशन मेहकर येळो दोन्ही घर फोडीबाबत गु.र.क्र. १०५/२०१५, भां.दं.वि. कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील माहिम येथील भवानी झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजनेबाबत**

**(१६) २८१५९ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर पश्चिम मुंबई जी-उत्तर विभाग हद्दीतील निकमवाडीमध्ये भूमापन क्र. ५६९ टी.पी.ए.IV, माहिम विभाग या ठिकाणी मे.अनिल कसले आणि कंपनी, वास्तुविशारद आनंद धोके यांनी भवानी झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजनेंतर्गत एक योजना पूर्ण केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये ३ ते ७ मजले अनधिकृतरित्या बांधून त्याचे व्यापारी गाळ्यामध्ये रुपांतर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मजल्यावरील अनधिकृत बांधकाम हटविण्यासाठी झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरणाकडून नोटीसही बजावण्यात आलेल्या असतानाही आजमितीस सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच मुख्य सुत्रधार मे. ओमकार बिल्डर्स हे असून त्यांनी मुंबई शहरात ठिकठिकाणी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेखाली बांधण्यात आलेल्या इमारतींमध्येही अशाच प्रकारे एफएसआय चे जाणीवपूर्वक उल्लंघन करुन बेकायदेशीर बांधकामे केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले त्यानुसार अनधिकृत बांधकामाविरोधात तसेच या बांधकामास पाठीशी घालणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्याविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विक्री घटकांतील इमारतीमधील ३ ते ८ मजले वाहनतळांसाठी मंजुर करण्यात आले होते. त्यापैकी ३ ते ६ मजल्यांवर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठीचे निर्देश विकासकाला देण्यात आलेले होते. तद्नुसार विकासकांनी सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित केल्याचे पत्र छायाचित्रांसह झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दिनांक २२.७.२०१५ रोजी सादर केलेले आहे सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित केल्याची खातरजमा स्थळ पाहणी करुन करण्यात आलेली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दलित समाजावरील अत्याचारासंदर्भात प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याबाबत**

**(१७) २८६०५ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील दलित अत्याचाऱ्याच्या सर्वाधिक घटनांची नोंद झाली असून राज्यात दलित समाजावरील अत्याचाराचे प्रमाण ७ टक्के असून उक्त प्रकरणात गुन्हे दाखल करून घेण्यासाठी टाळाटाळ केली जात असल्यामुळे सदर प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी विशेष न्यायालये असावीत अशी मागणी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे मा. अध्यक्ष यांनी केली असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलितांच्या वाढत्या अत्याचाराला पायबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच कामात हलगर्जी करणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१) सन २०१५ मध्ये राज्यामध्ये दलित समाजावर अत्याचार झाल्याबाबत अ.जा./ज.(अ.प्र.) कायदा, १९७९ अन्वये १८१६ व नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ अन्वये ७ असे एकुण १८२३ गुन्हे दाखल झाले असून, त्यापैकी ९६ गुन्हे अहमदनगर जिल्ह्यामध्ये दाखल झाले आहेत.

न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणेसाठी विधी व न्याय विभागाकडून ठाणे, औरंगाबाद व नागपूर येथे विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे.

(२) नागरी हक्क संरक्षण विभागाची स्थापना करुन त्यामध्ये अपर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असून, परिक्षेत्राच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधिक्षक, जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस निरीक्षक किंवा सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार/पोलीस शिपाई यांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत तक्रार प्राप्त झाल्यानंतर अॅट्रासिटी कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद झाली किंवा नाही ते खात्री केली जाते. गुन्ह्याच्या स्थळी भेट देण्या येते. आरोपीवर दोषारोपपत्र दाखल करुन पाठपुरावा करण्यात येते, घटनास्थळी शांतता राखण्यासाठी पालीस बंदोबस्त नेमून स्थानिक शांतता समितीच्या बैठका घेण्यात येते, पिडीत लोकांच्या जिवीत /मालमत्तेच्या नुकसानीची चौकशी व मुल्यमापन करुन आर्थिक मदत व पुनर्वसनासाठी पाठपुरावा करण्यात येते, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधी, दलित नेते, कार्यकर्ते, नागरीक, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेण्यात येते, तसेच संवेदनशील गावांमध्ये कार्यशाळा, सभा घेऊन जनजागृती निर्माण करण्यात येते. सन २०१५ मध्ये ७६१ जातीय सलोखा बैठक व ७०६ कार्यशाळा झाल्या आहेत. केंद्र व राज्य शासनाचे व राष्ट्रीय अनुसुचीत जाती आयोगांचे प्राप्त सुचनांबाबत वेळोवेळी परिपत्रके, ज्ञापने निर्गमित करण्यात येते.

(३) कामात हलगर्जी करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द अ.जा/ज.(अ.प्र.) कायदा, १९८९ चे कलम ४ अन्वये कारवाई करण्यात येते. सन २०१५ मध्ये हलगर्जीपणा केलयासंदर्भात कलम ४ अन्वये ६ गुन्हे दाखल झाले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील पोलीस स्टेशनचा कारभार प्रभारी अधिकारी पहात असल्याबाबत**

**(१८) २८६३० (२१-१२-०१६०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्थानिक गुन्ह्यांचा तपास करण्याबरोबरच नक्षलविरोधी मोहिमेची आखणी, नक्षलविरोधी अभियान राबवावे लागत असल्याने इतर जिल्ह्यांच्या तुलनेत येथील पोलीसांवर पडणारा कामाचा ताण लक्षात घेता पोलीस ठाण्याच्या प्रमुख पदी पोलीस निरीक्षक दर्जाचा अनुभवी पोलीस अधिकारी आवश्यक

असताना, नक्षलीदृष्ट्या संवेदनशील असलेल्या, पुराडा, कोरची, धानोरा, मुलचेरा, एटापल्ली, जाराबंडी, भामरागड व आसरअल्ली या पोलीस ठाण्याचा कारभार सहायक पोलीस निरीक्षक अथवा पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन त्यालाच प्रभारी अधिकारी म्हणून काम करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नक्षलग्रस्त जिल्ह्यातील सर्वच पोलीस ठाण्यातील कारभार पूर्णक्षमतेने चालण्यासाठी पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांची पदे पूर्ण क्षमतेने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशिल असलेल्या ठिकाणी सतत नक्षलविरोधी अभियाने राबवावी लागतात. अशा अभियानात सीआरपी व एसआरपी सोबत जिल्हा पोलीस सयुक्तपणे सहभागी असते. नक्षलवादी विरुध्दच्या कार्यवाहीत तरुण व होतकरु असलेल्या ३० ते ४० वयोगट असलेल्या अधिकायांची नितांत आवश्यकता असते. पोलीस निरीक्षक हे पद पदोन्नतीचे असून त्यांचे वय साधारणत: ५० च्या जवळपास असते. त्यामुळे त्यांना अशी अभियाने राबविणे कठीण जाते. म्हणून निशस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची १७ पैकी १७ पदे भरलेली आहेत संवेदनशिल पोलीस स्टेशन मध्ये नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षकांची नेमणुका केल्या आहेत. तसेच गडचिरोली / अहेरी जिल्ह्यांच्या आस्थापनेवर पोलीस निरीक्षकांच्या सदर ठिकाणी बदल्या करण्यात आल्या असून ते अद्याप हजर झाले नाहीत व रिक्त असलेल्या ठिकाणी प्रभारी कार्यभार सहायक पोलीस निरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आला आहे.
(२) गडचिरोली/ अहेरी येथील रिक्त असलेली निशस्त्र पोलीस निरीक्षकांची पदे सर्वसाधारण बदल्या- वेळी भरण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एलबीटी रद्द करण्याच्या शासनाच्या निर्णयाबाबत**

**(१९) २८६३६ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून एलबीटी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे राज्यातील महानगरपालिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नवी मुंबई महानगरपालिकेचे ६०० कोटी तर नाशिक महानगरपालिकेचे ३०० कोटीचे नुकसान झाले असल्याने महानगरपालिकांचे नियोजनच कोलमडून गेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महानगरपालिकांना आर्थिक बळ देऊन त्यांना विकासाचे कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

- ज्या व्यापाऱ्यांची धंद्याची वार्षिक उलाढाल ५० कोटीपेक्षा कमी आहे. अशा व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.

(२) शासनाने दिनांक ०१ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये ज्या व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल ५० कोटी पेक्षा कमी आहे अशा ९९.५% व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

- सदरहू निर्णयामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी घट भरुन काढण्यासाठी शासनाकडून दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये महानगरपालिकांना देय होणारे सहाय्यक अनुदान त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केले जाते.
- सहायक अनुदानाची परिगणना करताना महानगरपालिकेचे मागील ५ वर्षातील सर्वोच्च उत्पन्न आधारभूत मानुन त्यावरती ८% वाढ विचारात घेतली जाते.
- महानगरपालिकांकडे ५० कोटीपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांकडून प्रत्येक महिन्यात जमा होणारे एलबीटी व शासनाकडून देण्यात येणारे १% अतिरीक्त मुद्रांक शुल्क हे वजा करुन उर्वरीत रक्कम महानगरपालिकांना सहाय्यक अनुदान म्हणून वितरीत केली जाते.

(३) हे खरे नाही.

- नवी मुंबई महानगरपसालिकेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये ऑगस्ट ते मार्च २०१६ या ८ महिन्याच्या कालावधीमध्ये ५२१.६९ कोटी तर नाशिक महानगरपालिकेस ५००.७७ कोटी ऐवढे स्थानिक संस्था करापासून एकुण उत्पन्न प्राप्त होणार आह. त्यामुळे महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

(४) व (५) शासनाकडून महानगरपालिकांना त्यांच्या सर्वोच्च उत्पन्नावर ८% वाढ गृहीत धरुन अनुदान देण्यात येत आहे. त्यंसाठी कोणताही अतिरिक्त खर्च महानगरपालिकांना करावा लागत. त्यामुहे याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारती तसेच म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकासबाबत**

**(२०) २८७३७ (२१-०१-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सदा**

**सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारती तसेच म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील जुन्याव मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील ३३ (५), ३३ (७) नुसार किमान ३०० चौ.फूटाचे घर (आतील क्षेत्रफळ) व ३३ (९), ३३ (१०) अन्वये किमान ५०० चौ.फूटाचे घर (आतील क्षेत्रफळ) देण्याच्या शासन निर्णयानुसार माहे सप्टेंबर, २०१५ अखेर ५६ वसाहती पैकी किती वसाहतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत,

(२) असल्यास, पुनर्विकासाबाबतचा आराखडा शासनाने तयार केला आहे काय त्याचे स्वरुप काय आहे व सदर पुनर्विकास हा म्हाडामार्फत करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मंजूरी दिली आहे काय व मंजूरीच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (२१-०३-२०१६) :**(१) मुंबई महामंडळाच्या अखत्यारितील ५६ मोठ्या वसाहतीमधील एकंदर ८३८ प्रस्तावांना देकारपत्र/ ना हरकत प्रमाणपत्राची कार्यवाही विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंतर्गत करण्यात आलेली आहे.

(२) शासनाने दि. ०८.१०.२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार म्हाडाच्या वसाहतींमध्ये २.५ ऐवजी ३.०० इतके चटईक्षेत्र निर्देशांक लागू केले आहे. यामध्ये केवळ अतिरिक्त बांधकाम क्षेत्रातील गृहसाठ्याचा हिस्सा म्हाडास देण्याची तरतुद आहे.

याबाबतची पुढील कार्यवाही म्हाडा प्राधिकरणाकडून करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात सीसीटीवी कॉमेरे बसविण्याबाबत

**(२१) २९०७९ (२१-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात सीसीटीवी कॅमेरे बसविण्यासाठी साडे सहा कोटीची योजना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम माहे मे २०१५ मध्ये सुरु होणार होते तथापि अद्याप कामाला सुरुवात केली गेलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तातडीने काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) कोल्हापूर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत जिल्हा नियोजन मंडळ, कोल्हापूर यांच्याकडून रु. २ कोटी व कोल्हापूर महानगरपालिकेकडून रु. ४.६ कोटी असा एकूण ६.६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. सदर उपलब्ध निधीमधून कोल्हापूर शहरातील महत्वाची सार्वजनीक ठिकाणे, ट्रॅफिक सिग्नल चौक अशा एकुण ६५ ठिकाणी १६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

---

**मुंबईत ५७ हजार बेघरांसाठी केवळ सात रात्र निवारे असल्याबाबत**

**(२२) २९१३० (२१-०१-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ५७ हजार बेघरांसाठी केवळ सात रात्र निवारे असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १० फेब्रुवारी, २०१० मध्ये दिलेल्या निकालानुसार पाच लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये प्रति एक लाख व्यक्तीमागे १०० व्यक्तींच्या निवासाची सोय असलेल्या एक रात्र निवारा गरजेचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लक्षात घेता मुंबईत किमान १५० निवारे उभारण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने व मुंबई महानगरपालिकेने कोणती उपाययोजना केली आहे,

(५) असल्यास, मुंबईकरांसाठी किती रात्र निवारे उपलब्ध होणार आहेत व ते कधी पर्यंत उपलब्ध होणार आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्रती एक लाख लोकसंख्येमागे एक रात्रनिवारा याप्रमाणे १२५ रात्र निवारे शहरी बेघरांसाठी सुरु करणे आवश्यक आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात १२५ रात्र निवाऱ्यांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व संबंधीतांना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी विनंती केली आहे.

(५) सद्यस्थितीत मुंबई विभागामध्ये ७ रात्र निवारे सुरु असून काही स्वयंसेवी संस्थांचा लेखी होकार प्राप्त होताच, त्यांच्याशी करारनामा करुन ७ रात्र निवारे सुरु होतील, तसेच सद्या

उपलब्ध असलेल्या ६ जागांवर स्वारस्याची अभिव्यक्ती मागवून व पुढील प्रक्रिया करुन एकूण २० रात्र निवारे सुरु होतील. उर्वरित ५ रात्र निवारे मार्च, २०१६ अखेर सुरु होण्याचे प्रस्तावित आहे.
(६) मुंबई शहराची व्याप्ती पाहता रिकामा भूखंड मिळणे किंवा बेघर तेथे मोठ्या प्रमाणावर आहेत अशा ठिकाणी रात्र निवारा उभारण्यासाठी जागा उपलब्ध होणे कठीण असल्याने, जागा-उपलब्धतेनुसार रात्र निवारे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात येत आहेत.

---

### राज्यातील गावात तंटामुक्त गाव समित्या स्थापन करण्याबाबत

**(२३) २९२५२ (१६-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गावात तंटे निर्माण होऊ नयेत यासाठी याद्दष्टीने दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून सुरु झालेली महात्मा गांधी तंटामुक्ती गाव मोहिम ठप्प झाली असून गावपातळीवरील तंटामुक्त समित्या कागदावरच असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तंटामुक्त गाव समित्यांना उर्जितावस्था प्राप्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी चिंचपाड्यातील ग्रामस्थानी केलेले आंदोलन

**(२४) २९२६४ (२१-०१-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल नवी मुंबई येथील चिंचपाड्यातील विमानतळ प्रकल्पासाठी ग्रामस्थांना सिडकोने दिलेले आश्वासन पाळण्यात आले नसल्यामुळे ते आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोने ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनानुसार ग्रामस्थांना न्याय मिळण्याबाबत तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६)** :(१) नाही.
(२) नवी मुंबई आंततराष्ट्रीय विमानतळाचे कामकाज विहीत केलेल्या कालमर्यादेनुसार सुरु असून त्यात विलंब झालेला नाही व ते विहित मुदतीत पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील दादासाहेब गायकवाड नगर, मालवणी, मालाड पश्चिम येथील सोसायटीतील रहिवाशांना गुंडाचा त्रास होत असल्याबाबत

**(२५) २९३७६ (२१-०१-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादासाहेब गायकवाड नगर, गेट नं.८, मालवणी, मालाड पश्चिम येथील सोसायटीतील रहिवाशांना गुंडाचा त्रास होत असून गुंड मुलीची व महिलांची छेड काढत असल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक रहिवाशांनी मा. मुख्यमंत्री तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालवणी पोलीस ठाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, पोलीस आयुक्त यांच्याकडे दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची कारणे काय असून उक्त प्रकरणी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६)** :(१) होय.
(२) नाही.
या परिमंडळातील मालवणी पोलीस ठाणे येथे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये तक्रारी प्राप्त झाल्यानंतर विशेष पथकांना सदर ठिकाणी पाळत ठेवण्यात आदेशित करण्यात आले व २३ नशाखोर इसमांवर कलम ८ (क) सह २७ एनडीपीएस कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.
(३) गायकवाड नगर परीसरात बीट अधिकारी, बीट मार्शल, तसेच गस्तीवाहनांना वेळोवेळी गस्त घालण्यास व गैरप्रकार होताना दिसून येताच त्यांचेवर कडक कारवाई करण्याचे आदेश केले आहेत. सदर परीसरात कायदा व सुव्यवस्था पथक गस्तीकरीता नेमण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील रहिवाशांकडील खासगी विहीरीचा नि:शुल्क नियमबाह्य उपसा होत असल्याने महापालिकेला लाखो रुपयांचा भुर्दंड सोसावा लागत असल्याबाबत**

**(२६) २९४६४ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रहिवाशांकडील खासगी विहीरीचा नि:शुल्क नियमबाह्य उपसा होत असल्याने महापालिकेला जवळपास १५ लाख रुपयांचा भूर्दंड सोसावा लागला असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजीवा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी विहिरींना रु.५०० शुल्क असताना, नि:शुल्क व नियमबाह्य उपसा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) सार्वजकि गटार लाईनचे पाण्याने अथवा अतिचृष्टीमुळे आजूबाजूचे रस्त्यावरील पाणी विहीरीत गेल्याने खाजगी विहिरी दूषीत होत असतात. अश्याच प्रकरणात खाजगी विहिरीतील दूषीत पाण्याचा उपसा निशु:ल्क करण्यात येतो.

अशा प्रकरणात कार्यप्रणाली निश्चीत करण्यात आली असून खाजगी विहिरीची नि:शुल्क उपसा करण्यासंबंधी नागपूर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. ३६४ दि. ६/१२/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्मार्ट सिटी योजनेत पिंपरी चिंचवड शहर समाविष्ट करण्याबाबत**

**(२७) २९५५० (२१-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येणा-या स्मार्ट सिटी योजनेत समाविष्ट केलेले पिंपरी चिंचवड हे शहर सदर योजनेतून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) पिंपरी चिंचवड शहराचा स्मार्ट योजनेत समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६)** :(१) व (३) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियाना अंतर्गत पाहिल्या टप्प्यात राज्य शासनाने राज्यातील १० शहरांची निवड केलेल्या स्मार्ट शहरांमध्ये पुणे-पिंपरी चिंचवड नागरी समूहाची शिफारस केंद्र शासनास केली होती. परंतु केंद्र शासनाने नागरी समूहाची निवड न करता फक्त पुणे शहराची निवड संभाव्य स्मार्ट शहरांच्या यादीत केली आहे.
(३) व (४) पिंपरी चिंचवड शहराची स्मार्ट शहरामध्ये निवड करण्याबाबत पुन्हा दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

---

### केंद्राने १४ व्या वित्त आयोगानुसार मुलभुत सुविधासाठी पाठविण्यात आलेल्या रकमाचे वाटप न झाल्याबाबत

**(२८) २९७०८ (२२-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राने १४ व्या वित्त आयोगानुसार मुलभुत सुविधासाठी राज्य शासनाला पाठविण्यात आलेल्या ४९१ कोटी रुपयांपैकी शासनाने त्याचे वाटप माहे ऑगस्ट, २०१५ अखेर केले नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच सदर महानगरपालिकेच्या वाटयाला आलेली रक्कम तातडीन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) अद्‌याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६)** :(१) हे खरे नाही. निधी वाटपाचे आदेश दि. १४.७.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील मिठी नदीचे विकासाबाबत

**(२९) २९९७१ (२१-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले),**

**श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २६ जुलै, २००५ च्या जलप्रलयानंतर मिठी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली मात्र मागील पाच वर्षात प्राधिकरणाची एकही बैठक झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात मिठी नदीला पूर येऊन जनजीवन विस्कळीत होऊ नये तसेच नागरिकांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१), (२) व (३) मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या मा. मुख्यमंत्री व संरक्षण प्राधिकरणाच्या मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एकूण ०६ बैठका झाल्या असून मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची शक्ती प्रदत्त समितीच्या मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली एकूण ११ बैठका झाल्या आहेत.

मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण हे मिठी नदी व वाकोला नाल्याच्या विकास संदर्भात विविध यंत्रणेमधील कामासाठी समन्वयाचे काम करते, सदर मिठी नदी व वाकोला नाला ज्या क्षेत्रातून जातो त्या क्षेत्रांच्या संबंधीत "नियोजन प्राधिकरण" यांना मिठी नदी व वाकोला नाला विकासाच्या अनुषंगाने प्रकल्प, अंमलबजावणी करणे, भूसंपादन करणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे व प्रकल्पाच्या अनुषंगाने इतर कामे करण्यात येतात.

---

**अहमदनगर जिल्ह्यातून मुंबईत गोमांस तस्करी होत असल्याबाबत**

**(३०) ३०००५ (२१-०१-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातून मुंबईत गोमांस तस्करी होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गोमांस तस्करी करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१६) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्मार्ट सिटी योजनेसाठी शासनाने दहा शहरांची निवड केल्याबाबत**

**(३१) ३००५१ (२१-०१-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेसाठी शासनाने दहा शहरांची निवड केली आहे मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पुणे-पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर, सोलापूर आणि औरंगाबाद या शहरांमध्ये स्मार्ट सिटी योजना राबविण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ज्या शहरात स्मार्ट सिटी योजना राबविण्यात येणार त्याबाबत कृती आराखडा आखून त्यांच्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्यांचे स्वरुप काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियांनांतर्गत राज्यातील १० शहरे स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्यात येणार आहेत. राज्यातील १० संभाव्य स्मार्ट शहरांमध्ये बहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी-मुंबई, पुणे, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या शहरांचा समावेश आहे.

(२) व (३) स्मार्ट सिटी अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील १० संभाव्य स्मार्ट शहरांचे स्मार्ट सिटी प्रस्ताव केंद्र शासनास विहीत कालावधीत सदर करण्यात आले होते. केंद्र शासन स्तरावर पार पडलेल्या स्मार्ट सिटी चॅलेंज या स्पर्धेमधून राज्यातील पुणे व सोलापूर या शहरांची निवड केंद्र शासनाने केली आहे. केंद्र शासनाने निवडलेल्या स्मार्ट शहारासाठी ५ वर्षासाठी प्रतिवर्ष / प्रतिशहर केंद्र शासनाचे रु. १०० कोटी अनुदान मिळणार असून राज्य शासन स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रत्येकी रुपये ५० कोटी इतका हिस्सा द्यावयाचा आहे. अशा प्रकारे सदर अभियानांतर्गत स्मार्ट शहर म्हणून निवडण्यात आलेल्या शहरांना एकूण १००० कोटी निधी उपलब्ध होणार आहे.

---

**राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(३२) ३०१०८ (२२-१२-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे**

**(घनसावंगी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा असा आदेश मा.कामगार तथा वस्त्रोद्योग राज्यमंत्री यांनी कामगार विभागाला दिला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेऊन यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि, तत्कालीन मा. राज्यमंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्याबाबत मंत्रीमंडळ टिप्पणीचे प्रारुप तयार केले असता ते मा. राज्यमंत्री यांचेकडे मान्यतेस्तव सादर केले असता त्यामध्ये यंत्रमाग कामगारांसोबतच या उद्योगाशी निगडीत कांडीवाले, जॉबर, वारपिंग, सायझिंग इ. चा समावेश मंत्रीमंडळ टिपण्णीत करण्याचे माहे फेब्रुवारी २०१५ रोजी सुचित केले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ०६.१०.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापण्याच्या अनुषंगाने वित्त विभागान उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरण विकास आयुक्त यांनी सादर करावे व त्याअनुषंगाने विभागाने प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश मा. राज्यमंत्री (कामगार) यांनी दिले.

(२) यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने मंत्रालयातील विविध विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन घेणे प्रक्रियाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमाग भागधारक कामगारांच्या मागण्यांबाबत

**(३३) ३०४३९ (२१-०१-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमाग भागधारकांनी शासनाने काढण्यात आलेला किमान वेतनाचा अध्यादेश अयोग्य असल्याने त्याबाबत समिती नेमण्यात यावी अशी मागणी करुन सदर अध्यादेश रद्द करणेबाबत माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात

प्रांतअधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोर्चेकऱ्यांच्या मागणीनुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२१-०३-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यंत्रमाग उद्योगातील कामगारांचे किमान वेतन पुनर्निर्धारणाची शासन अधिसूचना दिनांक २९.१.२०१५ रोजी प्रसिध्द झालेली आहे. सदर अधिसूचनेनुसार किमान वेतन मिळावे, अशी या उद्योगातील कामगारांची मागणी आहे. तर, मालक वर्ग सदर अधिसूचनेनुसार किमान वेतन देण्यास तयार नाही.

सदर समस्येवर तोडगा काढण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून सदर उद्योगातील कामगार , मालक आणि संघटनेच्या प्रतिनिधींच्या शासन स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. या बैठकांमधील निर्णयानुसार दिनांक २९.१.२०१५ च्या अधिसूचनेबाबत पुनर्विचार करण्याकरिता दिनांक १७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये तज्ञ (तांत्रिक) समितीचे गठन करण्यात आले असून सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. शासनास प्राप्त झालेल्या अहवालावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कराड (जि.सातारा) तालुक्यातील वाघेरी येथील एका व्यक्तीस गावठी कट्टा व दोन जीवंत काडतुसे बाळगल्याप्रकरणी अटक केल्याबाबत

**(३४) ३०४६५ (२१-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील वाघेरी येथील एका व्यक्तीस गावठी कट्टा (पिस्तुल) व दोन जीवंत काडतुसे बाळगल्याप्रकरणी सातारा गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(२) सदर प्रकरणी अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपीविरुध्द कराड शहर पोलीस ठाणेत भाग ६ गुर नं. ३१६०/१५ भा.ह.का. क ३(१)५, २५, म.पो.का.क. ३७ (१) (अ) /१३५ प्रमाणे दि. ०४.०९.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून अग्निशहास्त्रासह एकूण ५१,५९०/- रु चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. गुन्ह्यांच्या तपास पुर्ण करुन

आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्राच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाला**
**कायमस्वरुपी संचालक देण्याबाबत**

**(३५) ३०५५९ (२३-१२-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाला कायमस्वरुपी संचालक नेमण्याबाबत गत काही महिन्यापासून शासन दुर्लक्ष करीत असुन सध्या या संचालनालयाच्या कार्यालयावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिक्रमण होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संचालनालयाचे कार्यालय एलफिस्टन तांत्रिक विद्यालयाच्या नांवावर असुन येथे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे हे राज्यस्तरीय पाच मजल्याचे मुख्यालय आहे या इमारतीतील पहिल्या अर्धा मजल्यावर नव्याने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण अभियान सुरु होणार असल्याचा निर्णय संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपले अधिकार वापरुन घेतला असल्याने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये कार्यरत असलेल्या अधिकरी व कर्मचारी यांची कामाकरिता बसण्याच्या जागेची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१) व (२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचानालयामध्ये संचालक (प्रशिक्षण) व संचालक (व्यवसाय शिक्षण) या दोन मंजूर पदांपैकी एक पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ३१.०७.२०१५ रोजी भरण्याची जाहिरात प्रसिध्द केली आहे. याबाबत आयोगाकडे पाठपूरावा सुरु आहे. आयोगाकडून शिफारस प्राप्त होताच आणि अन्य एक पद पदोन्नतीने भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागास सादर केलेल्या प्रस्तावावरील बिंदूनामावली प्रमाणित झाल्यावर संचालकाची पदे तातडीने भरण्यात येईल.

दरम्यान, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-१११५/प्र.क्र.१५४/विशि-३, दिनांक १४.०७.२०१५ अन्वये राज्यात राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षण योजनेंतर्गत (रुसा) राज्य प्रकल्प स्थापन करण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यंचानालयानाच्या एलफिस्टन तंत्र शिक्षण शाळेच्या आवारातील पहिल्या मजल्यावरील अर्धा भाग तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध

करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, विषयाधीन जागा आता कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली असल्याने रुसा कार्यालयासाठी जागेचे हस्तांतरण करण्यात आले नाही. आता रुसा प्रकल्पासाठी जागतिक व्यापार केंद्र (WTC) येथील १९ व्या माळ्यावर भाडे तत्वावर जागा घेण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यशासनाच्या विविध विभागात मागासवर्गीय संवर्गातील विविध गटातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(३६) ३२४९८ (१८-०१-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाच्या विविध विभागात मागासवर्गीय संवर्गातील विविध गटातील तब्बल २९ हजार ६११ पदे (सन२०१४ पर्यंत) रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागासवर्गीयांचा अनुशेष राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मागासवर्गीय संवर्गाती विविध गटातील रिक्त असलेले पद भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४)

दि. ३१.३.२०१४ अखेर गट -अ ते गट-ड मधील सुमारे २९६११ इतका मागासवर्गीयांचा अनुशेष होता. यापैकी सरळसेवेची अनुशेष २१४८५ व पदोन्नतीचा अनुशेष ८१२६ इतका आहे.

मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याच्या विशेष माहिमेस शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

शा.नि.दि. ३ जून २०१४ अन्वये गट-अ ते गट- ड संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी विहित केलेली प्रतिवर्षी मंजूर पदांच्या कमाल ३ टक्के ची मर्यादा रद्द करण्यात आली आहे.

वित्त विभागाच्या शा.नि.दि. २.६.२०१५ मधील परि. ३ )त्कर नुसार विशिष्ट संवर्गातील ७५ टक्के पदे भरण्यास मुभा आहे. तर परि.३(क) मधील संवर्गाव्यतिरिक्त इतर संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० टक्के किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी व कमी असेल इतकीच पदे भरावीत असे आदेश आहेत. तसेच वित्त विभागाच्या शा.नि.दि. १५.१.२०१६ नुसार, शा.नि.दि. २.६.२०१५ मधील अ(क) मध्ये नमुद संवर्गातील एकूण

रिक्त पदांपैकी ७५ टक्क्यांच्या ऐवजी ५० टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा आहे. सदर निर्बंधातून अनुशेषाची पदे वगळण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सध्या पदोन्नतीमधील अनुशेषाची पदे भरण्यास कोणतेही निर्बंध नाहीत.

अनुशेषाची पदे प्राथम्याने भरण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**राज्यातील ऊसतोड मजूरांच्या तोडणी, वाहतुकीचा दरात करार होईपर्यंत अंतरिम वाढ करण्याचा तसेच ऊसतोड मजूरांचे कल्याणकरी महामंडळ स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३७) ३३००८ (२२-१२-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड मजूरांचय तोडणी, वाहतुकीचा दरात करार होईपर्यंत अंतरिम वाढ करण्याचा, तसेच ऊसतोड मजूरांचे कल्याणकरी महामंडळ स्थापन करणचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने होण्याबाबत शासनाकडून आतापर्यंत कोणती ठोस कायर्वाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अंमलबजावणीस किती कालावधी अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत

**श्री. प्रकाश महेता (१५-०३-२०१६) :**(१) साखर आयुक्त, पुणे यांनी कळविल्यानुसार ऊसतोड मजुरांच्या ऊसतोडणी व वाहतुकीच्या दरात सन २०१५-१६ या हंगामापासून पुढील ५ वर्षाकरीता वाढ करण्यात आली आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या कल्याणार्थ मंडळ स्थापन करण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे, हे खरे आहे.

(२) राज्यातील ऊसतोड कामगारांचे जीवनमान आर्थिकदृष्ट्या अधिक सुरक्षित करणे, सामाजिकदृष्ट्या त्यांचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या जीवनात स्थिरता निर्माण करणे व त्यांना मुख्या मालकाकडून देय होणारी मजुरी व त्यावरील लेव्ही मंडळात जमा करुन मजुरीचे मंडळामार्फत कामगारांना वाटप करणे व लेव्हीच्या रकमेतून या कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, बोनस, रजेचा पगार, वैद्यकीय सुविधा इ. कल्याणकारी फायदे देणे, हा मंडळ स्थापन करण्याचा उद्देश आहे.

(३) व (४) ऊसतोड कामगारांसाठी माथाडी कायद्यांतर्गत मंडळ स्थापन करण्यापूर्वी ऊसतोड कामगारांच्या रोजगाराचा समावेश माथाडी अधिनियमासोबतच्या अनुसूचित करणे आवश्यक होते. त्यामुळे अधिनियमाच्या कलम २६ नुसार या रोजगाराचा समावेश अनुसूचित करण्यासाठीची मसुदा अधिसूचना दि.२६/२/२०१५ रोजी व अंतिम अधिसूचना दि.१७/१०/२०१५

रोजी निर्गमित केली आहे. तसेच कलम १(४) नुसार दि.२६/२/२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये उक्त रोजगारास माथाडी अधिनियमाच्या तरतूदी लागू केल्याचा नियत दिनांक २६/२/२०१५ हा निश्चित केला आहे. मंडळ कार्यान्वित करण्यापूर्वी अधिनियमाच्या कलम ४(१) नुसार मंडळासाठी स्वतंत्र योजना तयार करण्यत आली असून याच कलमाच्या तरतूदीनुसार सदरहू योजना महाराष्ट्र रज्य माथाडी सल्लागार समिती पुढे विचारविनिमयार्थ ठेवण्याची कार्यवाही सुरु असून समितीच्या शिफारशीनंतर सदरहू योजना प्रसिध्द करण्यात येईल. त्याचवेळी कलम ६(१) मधील तरतूदीनुसार मंडळ स्थापन केल्याची व कलम ६ ए मधील तरतुदीनुसार मंडळाचे कामकाज सुरु करण्यासाठी या मंडळावरील एक सदस्यीय मंडळाची तथा अध्यक्षांच्या नांवाने अधिसूचना निर्गमित करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळातील सचिव यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(३८) ३४३७६ (२१-०१-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळातील सचिव यांच्या मनमानी कारभाराबाबत त्यांच्या ऑफिसमधील कर्मचारी व कामगार वर्ग यांनी केलेल्या तक्रारी बाबत चौकशी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०१५ मध्ये शासनाकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर मागणीनूसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१४-०३-२०१६) :**(१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झाली असुन ह्या अनुषंगाने कामगार उपायुक्त, पुणे यांच्यामार्फत चौकशी करण्याचे कामगार आयुक्त यांनी आदेशीत केले असुन चौकशी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई पुणे नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीप्रमाणे ठाणे मेट्रो प्रकल्पासाठीही तरतुद करण्याबाबत**

**(३९) ३४८०१ (१४-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पुणे नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीप्रमाणे ठाणे मेट्रो प्रकल्पासाठीही तरतूद करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.वित्त मंत्री यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०३-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) वडाळा-घाटकोपर-ठाणे-कासारवडवली या मेट्रो रेल्वे मार्गाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून सदर मेट्रो रेल्वे मार्गाच्या सविस्तर अहवालाचे आद्यावतीकरण दिल्ली मेट्रो रेल महामंडळामार्फत (DMRC) करण्याचे हाती घेतले आहे. सदर अहवालाकरीता आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी रु. १० कोटी एवढी तरतूद केली आहे.

---

**माथाडी कामगारांच्या मागण्यांबाबत**

**(४०) ३५०८० (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकशाही आघाडी, जिल्हा चंद्रपूरच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी च्या सुमारास माथाडी कामगारांनी धरणे आंदोलन केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या माथाडी कामगारांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१५-०३-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र लोकशाह आघाडीने त्यांच्या दि.२४/८/२०१५ रोजीच्या निवेदनाद्वारे, चंद्रपूर माथाडी निरीक्षक श्री.शदीर कुरेशी यांची बदली करणे, त्यांना इतर निरीक्षकांप्रमाणेच पगार लागू करुन तेथील ठेकेदारांकडून ३०% लेव्ही जमा करावी तसेच तेथील महिला कामगारांना रु.३००/- हजेरी देण्यात यावी व चंद्रपूर माथाडी मंडळाचे लेखापरीक्षण करण्यात यावे, इ. अशा प्रकारच्या मागण्या केल्या आहेत.
(३) धुळे माथाडी मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या श्री.शादीर कुरेशी यांची शासन आदेश क्र.युडब्ल्यूए-१५१२/प्र.क्र.३४८०/कामगार-५, दि.२२/३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये चंद्रपूर माथाडी मंडळांतर्गत निरीक्षक पदी विशेष बाब म्हणून बदली करण्यात आली असून त्यानुसार श्री.कुरेशी हे दि.८/४/२०१३ पासून चंद्रपूर माथाडी मंडळात निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. श्री.कुरेशी यंना धुळे माथाडी मंडळाने ६ व्या वेतन आयोगानुससार दिलेल्या अंतिम वेतनपत्रकानुसार चंद्रपूर माथाडी मंडळामार्फत वेतन व भत्ते देण्यात येत आहेत.

तसेच वडसा रेल्वे माल धक्का येथे माथाडी कायद्याच्या तरतूदी कंत्राटदारांकडून मंडळामार्फत कामगारांच्या मजुरीवर ३०% लेव्ही प्रमाणे लेव्ही वसूल करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे तेथील महिला कामगारांनाही रु.३००/- प्रतिदिन मजूरी मिळवून देण्याबाबत मंडळाकडून कार्यवाही सुरु आहे. त्याचबरोबर मंडळाचे सन २०१२ पर्यंतचे लेखापरीक्षणाचे काम

पूर्ण झाले असून त्या पुढील आर्थिकवर्षाचे लेखापरिक्षणाचे काम करण्याची कार्यवाही मंडळामार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### भद्रावती (जि.चंद्रपूर) पोलिस ठाण्याला नविन ठाणेदार देण्याबाबत

**(४१) ३५०८४ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) पोलिस ठाण्याचे ठाणेदारांसह दोघा जणांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या कारवाईत अटक झाल्यानंतर या पोलिस ठाण्याला अद्‌यापही नविन ठाणेदार देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या पोलिस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था ढासळत चालली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पोलिस ठाण्याला तातडीने ठाणेदार देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही. दि. ३०.९.२०१५ आदेशान्वये भद्रावती पोलीस ठाण्याचे कामकाज पाहण्यासाठी पोलीस निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी दि. ३०.९.२०१५ आदेशान्वये श्री.अे.जी.बोत्रे. पोलीस निरीक्षक यांची भद्रावती पोलीस ठाण्याचे कामाकाज पाहण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर शहरातील महानगरपालिकेच्या तीन मोठ्या रुग्णालयात स्वाईन फ्ल्युच्या प्रार्दुभावामुळे ६५ रुग्णांचा बळी गेल्याबाबत

**(४२) ३६३९० (२१-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील महानगरपालिकेच्या तीन मोठ्या रुग्णालयात स्वाईन फ्ल्युच्या प्रार्दुभावामुळे ६५ रुग्णांचा बळी गेल्याबाबतची बाब उघडकीस आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीनही मोठ्या महानगरपालिकेच्या रुग्णालयात रुग्णांचा उपचार करण्याकरिता व्हेंटीलेटर, ऑक्सिजन व संशयित रुग्णांचे नमुने तपासण्याची विशेष सोय नसल्यामुळे त्यांचा बळी गेलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयात ३६ एमबीबीएस डॉक्टर असून त्यातील २८ नियमित व १० कंत्राटी पध्दतीवर काम करित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयातील रुग्णांची भविष्यात कुठल्याही प्रकराची गैरसोय होणार नाही त्याकरिता आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) नागपूर महानगरपालिकेच्या इंदिरा गांधी रुग्णालय, गांधीनगर, पाचपावली सुतिकागृह पाचपाली, आयसोलेशन रुग्णालय इमामवाडा या तीन रुग्णालयात स्वाईन फ्ल्यू रुग्ण भरती केले जात नाहीत. त्यामुळे ही बाब खरी नाही.

तथापि, नागपूर महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या दोन शासकीय व ३५ खाजगह दवाखान्यात भरती असलेल्या ६५ स्वाईन फ्ल्यू रुग्णांचा मृत्यू झालेला आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) नागपूर महानगरपालिकेच्या एकूण तीन रुग्णालयात मिळून एकूण १८ वैद्यकीय अधिकारी स्थायी व १ वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरुपात आहे.

या १८ पैकी एमबीबीएस- एमडी ८, एमबीबीएस- एमएस१, एमबीबीएस-डीसीएच-१, एमबीबीएस-डिजीओ-१, एमबीबीएस-डीएनबी-१, एमबीबीएस-३ आणि बीएएमस-४ असे डॉक्टर कार्यरत आहेत.
(४) नागपूर महानगरपालिकेच्या १० दवाखान्यामध्ये स्वाईन फ्ल्यू स्क्रिनींग सेटर आहेत व झोन स्तरावर झोनल वैद्यकीय अधिकारी असे रुग्ण आढळल्यास रुग्णाच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णाच्या संपर्कातील व्यक्तीस रोगप्रतिबंधात्मक औषधे वाटप करणे, या रोगासंबंधी बॅनर्स, पोस्टर, हस्तपत्रके इ. च्या माध्यमातून महापालिका वेळोवेळी जनजागृती करीत असते.

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या दोन शासकीय व ३५ खाजगी दवाखान्यात अशा रुग्णांच्या उपचारासाठी व्हेंटीलेटर, ऑक्सिजन व संशयित रुग्णाचे नमुने तपासण्याची विशेष सोय करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

---

**राजूरा (जि.चंद्रपूर) येथील माणिकगढ व अंबुजा (मराठा) सिमेंट कंपन्यांमध्ये कंत्राटी कामागारांचे शोषण होत असल्याबाबत**

**(४३) ३६६६५ (२२-१२-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूरा येथील (जि.चंद्रपूर) माणिकगढ व अंबुजा (मराठा) सिमेंट कंपन्यांमध्ये कंत्राटी कामगारांचे शोषण होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षे कंपनीतील कंत्राटी कामगारांकडून काम करुन घेतल्या नंतरही त्यांना कायमस्वरुपी नोकरी पासून वंचित ठेवले जात आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात कामगार आयुक्त व संबंधित विभागांना पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणून दिल्यावरही त्यांचे कडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कंत्राटी कामगारांना कायम स्वरुपी नोकरीत सामावून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०३-२०१६) :**(१) ते (५) बाबत.....
विषयांकित आस्थापनेचे समूचित शासन हे "केंद्र शासन" असून सहायक श्रम आयुक्त (केंद्रीय) यांच्याकडे अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे त्या कार्यालयाने कळविले आहे.

---

**मा.उच्च न्यायालयाने डान्सबार वरील बंदी उठविण्याचा दिलेला निर्णयाबाबत**

**(४४) ३६९९० (२१-०१-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुरु असलेले डान्सबार तत्कालीन शासनाने बंद केले होते या प्रकरणी एका याचिकेच्या दरम्यान पुरेसे पुरावे शासनाने मा.उच्च न्यायालयात सादर न केल्याने मा.उच्च न्यायालयाने डान्सबारवरील बंदी उठविण्याचा निर्णय दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्याय, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१६) :**(१) नाही. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने शासनाने घेतलेल्या डान्सबारमधील बंदीच्या निर्णयास स्थगिती दिली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती विभागाअंतर्गत १४ लक्ष नागरीक आधार कार्ड पासून वंचीत असल्याबाबत**

**(४५) ३७१४१ (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागाअंतर्गत १४ लक्ष नागरीकांना अद्यापही आधार कार्ड मिळाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनस्तरावर काय उपाय योजना करण्यात आल्या आहेत,
(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१६)** :(१) होय, २०१५ च्या अपेक्षित लोकसंख्येनुसार अमरावती विभागाची लोकसंख्या १,१९,०९,३९९ इतकी आहे. यापैकी १,०४,५९,१६९ नागरिकांच्या आधार कार्डाची निर्मिती झाली असून १४,५०,२३० इतक्या नागरिकांची आधार नोंदणी अद्यापही शिल्लक आहे.
(२) अमरावती विभागात माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या २९७ आधार नोंदणी किट्स कार्यरत असून नॉनस्टेड रजिस्ट्रार संस्थेच्या २३ आधार नोंदणी किट्स कार्यरत आहेत.
माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून अमरावती विभागासाठी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात २२५ अतिरिक्त आधार नोंदणी किट्स उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, जेणे करुन उर्वरित आधार नोंदणीचे काम तातडीने होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अत्याधुनिक अग्नीशमन यंत्रणा केंद्र उभारणे व उपकेंद्राचा विकास करण्याबाबत**

**(४६) ३७१९० (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती हे विभागीय मुख्यालय असून विदर्भातील लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून दुसऱ्या क्रमांकाचे शहर असून अग्नीशमन यंत्रणा कामानुरुप अपुरी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती महानगरपालिका क्षेत्रात अत्याधुनिक अग्नीशमन यंत्रणा उभारण्याबाबत, कोणती उपाययोजना केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६)** :(१) अग्नीशमन यंत्रणा अपुरी असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे नाही.
(२) अग्निशमन विभागाचे बळकटीकरणाचे दृष्टीेकोनातून उपलब्ध अग्निशमन केंद्र व साहित्याव्यतिरिक्त १ वॉटर ब्राऊझर, २ रेस्क्यु टेंडर आणि फोम टेंडर खरेदी करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, आणखी ३ अग्निशमन केंद्र उभारण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(३) याबाबत परिस्थितीच्या आढाव्याअंती आवश्यक ती कार्यवाही महापालिका स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक व सल्लागार ही पदे रिक्त असल्याबाबत**

**(४७) ३८१८७ (२१-०१-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र अग्निशमन सेवा अंतर्गत संचालक व महाराष्ट्र अग्निशमन अधिनियम २००६ नुसार सल्लागार हे पद ब-याच कालावधी पासून रिक्त असल्याने राज्यातील अग्निशमन सेवा कामकाजावर विपरीत परिणाम झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील पदासाठी पात्र नसलेल्या अधिका-यांकडे तात्पुरता अधिकार दिलेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदावर नियमित पात्र अधिकारी नेमण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा या पदाचा अतिरिक्त कार्यभार सह/मुख्य अग्निशमन अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

(३) संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा या पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पद भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ५० कोटी रुपयापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यापाऱ्यांना स्थानिक करातून माफी देण्याबाबत**

**(४८) ३८३५३ (२०-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५० कोटी रुपयापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यापाऱ्यांना स्थानिक करातून माफी देण्याचा निर्णय दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ पासून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच महापालिकाची विकास कामे पुरेशा प्रमाणात व्हावीत म्हणून महापालिकांना पुरेशा प्रमाणात निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे. शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून रु. ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापारांना स्थानिक संस्था करातून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे.

(२) महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तूट भरुन काढण्यासाठी शासनाकडून दरमहा सहायक अनुदान देण्यात येत आहे.
(३) महानगरपालिकांना मागील ५ वर्षातील सर्वोच्च उत्पन्न विचारात घेऊन त्यावरती ८ % वाढ धरुन सहायक अनुदान देण्यात येत आहे. यामुळे महानगरपालिकांच्या विकास कामावर कोणताही अनिष्ट परिणाम झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळपीर (जि.वाशिक) येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायधीशांची नियुक्ती करणे तसेच इमारत बांधकामास निधी उपलबध करुन देण्याबाबत**

**(४९) ३९४३९ (२१-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगरुळपीर (जि.वाशिम) येथे अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश व विद्यमान व्यवहार (वरिष्ठस्तर) न्यायधीशांची नियुक्ती करणे तसेच इमारत बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना तसेच मा. बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दिनांक २६ मार्च, २०१५ रोजीचे पत्र सद्य:स्थितीदर्शक माहिती व अभिप्रायार्थ पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे आय.टी.आय संस्थेतील प्रशिक्षण मशिनरी ही अत्यंत जुन्या स्वरूपाची (कालबाह्य) असणेबाबत**

**(५०) ३९५५१ (२०-०१-२०१६). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे आय.टी.आय संस्थेतील प्रशिक्षण मशिनरी ही अत्यंत जुन्या स्वरूपाची (कालबाह्य) आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मशिनरीचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उपयोगी पडत नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मशिनरी बदलण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे येथे सुधारीत अभ्यासक्रमानुसार यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली असून त्यानुसार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहेत. कालानुरुप जुनी झालेली तसेच दुरुस्त व करण्याजोगी यंत्रसामुग्री निर्लेखित करण्याची कार्यवाही करण्यात येत असून निर्लेखनानंतर आवश्यकतेनुसार तसेच अनुदानाच्या उपलब्धतेनुसार यंत्रसामुग्री खरेदी करण्यात येते. आवश्यकतेनुसार बंद बसलेली यंत्रे प्रात्यक्षिकासाठी वापरण्यात येतात. सदर संस्थेत ऑगस्ट २०१५ प्रवेश सत्रात १६८३ जागांपैकी १६१२ इतके प्रवेश झाले असून प्रशिक्षण सुरळीतवणे सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.